श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

मासिक पुस्तक

वर्ष ११ अंक ७] भाद्रपद [श. १८५६

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका

—शंकराचार्य

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| अनुभव ... ... ... ... ... ... | १-७ |
| ग्रीक लोकांत भागवतधर्माचा प्रसार ... ... ... | ८-९ |
| जुलई महिन्याचें शिर्डीवृत्त ... ... ... ... | १०-१८ |
| आगस्ट महिन्याचें शिर्डीवृत्त ... ... ... ... | १९-२२ |
| पुण्यतिथिउत्सव ... ... ... ... ... | २३ |
| उत्सवाचा कार्यक्रम ... ... ... ... ... | २४-२६ |
| शिरडी संस्थानचा शके १८५४ सालचा जमाखर्चाचा आढावा | |
| स्फुट विषय ... ... ... ... ... | ९३९-९४६ |


## विनंति

वर्गणीदारांस नम्र विनंती करण्यांत येत आहे कीं, या सालीं V.P. करण्यांत आली नसल्यामुळें ज्यांनीं वर्गणी अद्यापि पाठविली नाहीं, त्यांनीं कृपा करून ती खालील पत्त्यावर पाठवून द्यावी. अथवा V.P. करण्याचें सुचवावें.

रा. आ. तर्खड,

व्यवस्थापक—श्रीसाईलीला

५१ E, पाली रोड, खार, मुंबई २१; आणि ऑ. खजिनदार,

श्रीसाईबाबा शिरडी संस्थान

सुप्रसिद्ध श्री. मोरोपंत कविकृत केकावलि या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती, तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. कि. रु.२

रा. आ. तर्खड,

व्यवस्थापक—श्रीसाईलीला कचेरी

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमच्याकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

रा. आ. तर्खड,

—प्रकाशक

# अनुभव

## श्रीदत्तचित्साईसद्गुरुभ्योनमः

श्रीसाईलीला संपादकमहाशय यांस कृ. शि. सा. न. वि. वि.

सुमारें एक वर्षामागें शिर्डीसंस्थानकमिटीनें शिरडी संस्थानांत एक नवीनच गवयाची जागा निर्माण करून त्या जागेवर भोर संस्थानांतील शिरवळ गांवचे श्रीयुत गणेश गोपाळ देशपांडे यांची नेमणूक केली आहे. त्यासंबंधीं श्री. देशपांडे यांना पडलेलीं स्वप्नें फारच मजेदार व बोधप्रद असल्या कारणानें त्यांनीं माझ्या विनंतीवरून तीं लिहून मजकडे पाठविलीं आहेत. तीं आपल्या विबुधमान्य श्रीसाईलीलेच्या अंकांत छापून प्रसिद्ध करण्यास करद्वय जोडून प्रार्थना आहे. **बाबांचें बाळ**

" माझी नेमणूक शिर्डी संस्थानांत गवई म्हणून होण्यापूर्वीं मी श्रीज्ञानेश्वरमाउलींच्या अलकापुरींत त्यांची सेवा करून होतों. शिर्डी संस्थानांत गवयाची जरूर आहे असें माझ्या कानावर आलें. मी शिर्डी संस्थानचे विश्वस्त श्री. देव यांना शिरवळ मुक्कामीं नूतन श्रीदत्तमंदिरांत भेटलों. त्यांचें व माझें बोलणें होऊन शिर्डीस श्रीबाबांच्या दरबारांत गवई म्हणून जाण्याचें ठरविलें. मी अलकापुरीस परत गेलों. मुलेंमाणसें तेथें होतीं. आम्ही वारकरी पंथाची मंडळी. आम्ही पंढरीरायाचीं व ज्ञानेश्वर-माउलीचीं लेंकरें. आमचें प्रवचन, भजन, कीर्तन विठ्ठलपुरींत किंवा ज्ञानेश्वर-नगरींत किंवा कोणत्याही विठ्ठलमंदिरांत व्हावयाचें व आतां तर मला गायन, वादन, प्रवचन, भजन, कीर्तन श्रीसाईबाबांच्या समाधिमंदिरांत करावें लागणार, व श्रीबाप रखुमादेवीवरू व श्रीज्ञानेश्वरमाउली यांचे पाय अंतरणार, असा विचार मनांत येऊन मन उद्विग्न होऊन द्विधा झालें. शिर्डीस जावें कीं न जावें असें वाटूं लागलें. जावें तर वारकरीपंथाच्या विरुद्ध वागल्यासारखें होईल; न जावें तर शिर्डीस जाण्याकरतां श्री. देव

यांजकडून खर्चाकरितां पैसेही आले आहेत. शिवाय मी अलकपुरी सोडूं नये, असा गांवकरी लोकांचाही आग्रह. अशा स्थितींत काय करावें हें सुचेना. इतक्यांत एक युक्ति सुचली कीं शिरडीस जावें कीं न जावें याबद्दल श्रीज्ञानेश्वरमाउलीच्या समाधीवर चिठ्या टाकाव्या व चिठींत जसें येईल तसें करावें. गांवकरी लोकांना ही हें म्हणणें पटलें. चिठ्या तयार करून ज्ञानेश्वरमाउलीच्या समाधीवर ठेऊन मुलाकडून त्यांपैकीं एक चिठी उचलवून घेतली. शिर्डीस जावें असें त्या चिठींत आलें. गांवकरी लोकांचें समाधान झालें नाहीं. पुन्हा आणखी एकवार चिठ्या टाकण्याचें ठरलें; पुन्हा दुसऱ्या चिठ्या तयार करून पुन्हा समाधीवर ठेवून दुसऱ्या मुलास उचलण्यास सांगितलें. त्यांतही शिर्डीस जावें असेंच आलें. गांवकरी लोकांनीं आपला आग्रह सोडून शिर्डीस जाण्यास मला परवानगी दिली.

शिरडीस गेल्यावर तेथें आपला योगक्षेम कसा चालेल, आपल्या ओळखीदेखीचें तेथें कोणी नाहीं, वगैरे वगैरे कल्पनांचें काहूर मनांत उठूं लागलें. कांहीं झालें तरी ज्ञानेश्वरमाउलीचे चरण सोडूं नयेत, खर्चाकरितां आलेले पैसे परत करावे असें वाटून चित्तास अस्वास्थ्य वाटूं लागलें. याप्रमाणें मनाची तळमळ चालली असतां त्या रात्रीं मला स्वप्न पडलें कीं, एक भव्य पुरुष माझ्यापुढें आले व म्हणाले कीं, अरे, अशी काळजी करीत कां बसला आहेस ? जो मी तेथें आहें, तोच मी येथें आहें, शिर्डीस जा; काळजी करूं नकोस. इतकें पाहून मी जागा झालों माझ्या मनाची तळमळ दूर झाली. श्रीज्ञानेश्वरमाउली व श्रीसाईबाबा दोघे नाहींत असें वाटलें व शिर्डीस जाण्याचा निश्चय कायम करून मुलांमाणसांसह मी शिर्डीस निघून गेलों. तेथें गेल्यावर ज्या ज्या मंडळींना भेटण्याकरितां श्री. देव यांनीं सांगितलें होतें, त्या त्या मंडळीच्या गांठी घेतल्या. माझी सर्व व्यवस्था ठीक लागली. श्री. देव यांनीं आंखून दिल्याप्रमाणें माझा नित्याचा कार्यक्रम सुरू झाला.

हल्लीं मजकडे, माझी नेमणूक येथें झाल्यापासून, श्रींच्या समाधीपुढें गायन, पुराण, सतारवादन, भजन व कीर्तन अशीं कामें आहेत व तीं नियमितपणें चाललीं आहेत. पूर्वीं श्रीदासगणूमहाराज यांच्या संप्रदाया-प्रमाणें मी फक्त दर एकादशीसच कीर्तन करीत असें. परंतु पुढें श्री. देव व संस्थनकमिटीच्या आज्ञेप्रमाणें दर एकादशीस व दर गुरुवारीं श्रींपुढें कीर्तन करीत असतों.

कांहीं झालें तरी कित्येक वर्षांचा मनावर जो संस्कार झालेला असतो, तो एकदम बदलत नाहीं, संशय जात नाहीं; शंका दूर होत नाहींत. आम्ही वारकरी म्हणजे वैष्णवपंथी. आम्ही वैष्णवांचेच गुणानुवाद कीर्तनांत वर्णन करणार किंवा पुराणांत सांगणार.

एके एकादशीस श्रीपुढें कीर्तन चाललें. त्या वेळीं " वैष्णवासंगतीं सुख वाटे जीवा " या श्रीतुकोबारायांच्या अभंगावर व्याख्यान चाललें. आतां वैष्णवांत श्रेष्ठ कोण ? तर " ज्ञानदेव वैष्णव मोठा । विठ्ठल नामें मुक्त देठा । स्नान दान थंड श्रेष्ठा । वैकुंठ वाटा भक्त गेले ॥ " या अभंगान्वयें ज्ञानेश्वर वैष्णवांत ( म्हणजे विष्णु किंवा विठ्ठलभक्तांत ) श्रेष्ठ असें ठरलें व त्याप्रमाणें मीं त्या कीर्तनांत ज्ञानेश्वरमाउलीचेच गुणानुवाद वर्णन केले. या रूपानें मीं जी ही ज्ञानेश्वरमाउलीची बरीचशी सेवा केली, ती साईबाबांना पसंत पडली असें मला वाटलें. कारण माझें मन त्या वेळीं फारच प्रफुल्लित झालें होतें. श्रोतृसमाजही त्या रात्रीं बराच होता. सर्वांना आनंद झाला व कीर्तन सुमारें एक वाजतां आटोपलें. मी बिऱ्हाडीं आलों. सर्व मंडळी आपापल्या घरीं गेली.

मला झोंप लागेना. " वर्षाकालीं सरिता । जैसी चढों लागे पंडुसुता । " अशा प्रकारचीं ज्ञानेश्वरींतील पुष्कळ कडवीं मनांत येऊं लागलीं. आनंद वाटला व त्या आनंदांत मी झोंपलों. तरी पण ज्याचा मनांत ध्यास तेंच डोळ्यांसमोर दिसूं लागलें. नंतर कांहीं वेळानें मला

स्वप्न पडलें कीं, एक भव्य पुरुष गौरवर्ण, डोक्यावर जटाभार, पांढ
शुभ्र दाढी, गळ्यांत तुळसीची माळ, अंगांत भगवी कफनी, हातां
कांहीं तरी फळ, कफनीवर काळीभोर तुळसीची माळ रुळत होती ( आत
सुद्धा हें लिहितांना माझ्या अंगावर रोमांच उभे राहतात.) अशी स्वा
येऊन माझ्या उशागती उभी राहिली. त्यांनीं मला हालविलें. मी निरख
पाहतों, तों वरील वेषांत असलेली मूर्ति मला दिसली. ते मला म्हणाले की
आज तुम्ही कीर्तन केलें. त्यांत तुम्ही श्रीज्ञानेश्वरमहाराजांची स्तुति केल
पण तुम्हास कधीं ज्ञानेश्वरमहाराजांचें दर्शन झालें आहे काय ? मीं म्हटलें
'महाराज, आम्ही तितक्या योग्यतेचे नाहींत. आम्हास दर्शन कसचें होतें !
मग महाराज म्हणाले, 'तुम्ही डोळे झांका.' तसे मीं डोळे झांकले. आतां
उघडा असें म्हणतांच मी उघडले, आणि पाहतों तों एक संन्यासी दिसले
डोक्यावर केंस नाहींत, दाढी नाही, मिसरुट तुरळक उगवलेलें, डोळे पाणीदार
गळ्यांत भगव्या कफनीवर माळ, हातांत माळ मृगासन, वर्ण गौर, तेजस
अशी मूर्ति अवलोकन केल्यावर मी खडबडून उठून त्या मूर्तीस साष्टांग नम-
स्कार घातला. नंतर ते म्हणाले, 'अगोदर तुम्ही जें रूप पाहिलें, तोच मी
आहें. आतां मला वैष्णव समजालं कीं नाहीं ?' मी म्हणालों, ''महाराज
अनुभवावांचून श्रद्धा बसत नाहीं. आपण (साईबाबा) ज्ञानेश्वरमहाराजच आह
अशी आतां माझी पक्की समजूत झाली. आपण वैष्णव आहां हें मला पूर्ण
कळलें.' याप्रमाणें बोलणें झाल्यावर महाराजांनीं मला पुन्हा डोळे झांकाव
यास सांगितलें. मीं डोळे झांकले; नंतर पुन्हा उघडण्यास सांगितलें
मीं डोळे उघडले, आणि पाहतों तों त्या संन्यासमूर्तीनीं पुन्हा पहिलें रूप
धारण केलें व आतां मी जातों असें म्हणून, हातांतील फळ मला देऊन ती
मूर्ति अंतर्धान पावली.

नंतर लागलीच काकडआरतीची पांच वाजल्याचा घंटा झाली
मीही पण उठून मंदिरांत गेलों व श्रीसाईमहाराजांच्या पुढें साष्टांग नमस्कार
घातला व साईबाबा हे वैष्णवश्रेष्ठ म्हणजे ज्ञानेश्वरमहाराज नव्हेत अ

आजपर्यंत (प्रथम आळंदीहून निघते वेळीं " मीच तेथें आहें " असा जरी दृष्टांत झाला तरी सुद्धा ) मानीत होतों, या अपराधाची क्षमा मागितली.

हा अनुभव मी लिहून देण्यास तयार नव्हतों. परंतु भक्तमंडळीच्या आग्रहावरून लिहून दिला आहे. वरील स्वप्नांत आणखीही बरींच भाषणें झालीं; परंतु तीं आतां आठवत नाहींत. जेवढें आठवलें तेवढें लिहिलें. गेल्या गुरुपौर्णिमेच्या वेळीं काल्याच्या कीर्तनांत बाबांच्या मंदिरांत हीच हकीकत श्रोतृसमाजापुढें व्यक्त केली होती. ती कीर्तनास त्या वेळीं हजर असलेल्या भक्तमंडळींच्या ध्यानांत असेल.

असो. पुन्हा एके दिवशीं श्रींच्या समाधीपुढें पुराण सांगत असतांना, सात्विक, राजस व तामस या गुणांवर प्रवचन चाललें. त्यांत सात्विक गुण श्रेष्ठ आहे असें मी प्रतिपादन केलें. परंतु श्रोतृसमाज शंकित झाला व हल्लीं राजस गुणाचाच जिकडेतिकडे जास्त फैलाव आहे. सात्विक गुण पाहवयास सुद्धा मिळत नाहीं असा अनुभव आहे, अशा प्रकारची पुष्कळशी वाटाघाट झाली.

मी सांगितलें कीं, श्रीमद्भगवद्गीतेंतील १७ व्या अध्यायांत सात्विक आहार, सात्विक यज्ञ, दान, तपें, कर्में सांगितलीं आहेत. त्याप्रमाणें आचरण केलें असतां मनुष्यास सात्विक गुणाची प्राप्ति होऊन भगवत्प्राप्तीही होईल. श्रोतृसमाजास तें पटलें नाहीं. पुराण संपलें. माझ्या मनांत मात्र तेच विचार सारखे घोळत होते व याची सत्यता श्रींकडूनच पटावयास पाहिजे असें मनांत आलें. त्याच रात्रीं मला स्वप्न पडलें तें असें कीं, मी मंदिरांत पुराण वाचण्यास बसलों आहें, श्रोतृसमाजांत श्रीनंदराम मारवाडी, गोविंद कमलाकर दीक्षित, अण्णासाहेब, बाळोबा शिंपी, शिंदे, भीमाबाई व आणखीही इतर पुष्कळ मंडळी बसली आहेत व श्रीज्ञानेश्वरींतील बाराव्या अध्यायातील " अथचित्तं समाधातुं " या श्लोकभाष्यावर प्रवचन चाललें आहे. इतक्यांत मंदिरांतून एक भव्य पुरुष बाहेर आले व मंडळींत उभे राहून त्यांना उद्देशून बोलूं लागले, कीं:—

माझ्या पुराणिकांनीं जें सांगितलें तें अगदीं खरें आहे. कारण सात्त्विक गुणाचाच लाभ घ्यावयाचा असेल, तर अभ्यासच केला पाहिजे व सात्त्विक गुणाची प्राप्ति झाली तरच भगवत्प्राप्ति होईल. तुम्ही उगाच त्यांच्याशीं वाद केला. आतां जगांत जरी रजो व तमो गुणांचेंच आधिक्य दृष्टीस पडतें, तरी तिकडे प्रवृत्ति न होऊं देतां सात्त्विक गुणच वाढवीत जावा.

या भव्य पुरुषाच्या अंगावर पांढरी कफनी व डोईस पांढरें फडकें होतें. ते उंच, सशक्त व तेजःपुंज होते. श्रीभीमाबाईंनीं त्यांना पाहून त्यांच्या पायांवर लोटांगण घातलें. तसें सर्वांनीं त्यांना साष्टांग नमस्कार घातला. श्रीनंदरामभाई मारवाडी मला म्हणाले कीं, साईबाबामहाराज म्हणून जे म्हणतात ते हेच. मग मी पुराणातून उठून त्यांना साष्टांगनमस्कार घातला. नंतर ते तुर्वतींत जाऊन अंतर्धान पावले. मी जागा झालों व अपरात्रींच भजन करीत बसलों.

सारांश, श्रीसाईबाबा जरी समाधिस्थ आहेत, तरी अत्यंत जागरूक आहेत व वेळोवेळीं भक्तप्रमाद व गैरसमज दूर करण्यांत, भक्तांचें संरक्षण करण्यांत माउलीप्रमाणें रात्रंदिवस तत्पर आहेत, असा माझ्या मनाचा पूर्ण ग्रह झाला आहे. असे अनुभव येथें आल्यापासून वारंवार येतात, परंतु ते सर्वच मी प्रसिद्धीकरतां पाठवीत नाहीं.

गेल्या मार्गशीर्ष शुद्ध पक्षांत मी आळंदीच्या वारीस गेलों व तसाच एकदोन दिवस घरीं म्हणजे शिरवळास गेलों. तेथें श्री. देव मामलेदार श्री. दत्तजयंतीकरतां आले होते. उत्सवाला नेहमीचे कीर्तनकार आले नाहींत. देव मामलतदार यांनीं मला श्रीपुढें दोन दिवस कीर्तन करण्यास सांगितलें. मीं त्यांच्या आज्ञेप्रमाणें कीर्तन केलें व शिरडीस जाण्याकरतां त्यांची परवानगी मागितली. ते म्हणाले, "एकदोन दिवसांनीं जा." पण मला तेथें चैन पडेना. मीं म्हटलें "रावसाहेब, मला जाऊं द्या, तेथें कार्यक्रमांत व्यत्यय येईल. मी कशी तरी ५–६ दिवसांची व्यवस्था श्री. बाळाभाऊ गुरवांना सांगून आलों आहें." ते म्हणाले, "जाल हो, मी तुम्हांला सांगतों आहें ना,

जा आणखी एकदोन दिवसांनीं ! कां इतकी घाई करतां ? बरेच दिवसांनीं घरीं आलां अहां ! राहा आणखी एकदोन दिवस व मग जा." मी राहिलों, इतक्यांत त्या रात्रीं मला स्वप्न पडलें कीं, एक उंच वृद्ध दाढीवाले कफनी घातलेले माझ्या ओळखीचे पुरुष मजकडे आले व मला म्हणाले कीं, "कायकु वास्ते रहता हय यां ? चलो शिरडीकु, हमकु गाना सुनेकु नहि मिलता है," हें साईनाथ, हे साईनाथ असें म्हणून मी झोपेंतच ओरडूं लागलों, माझ्या मुलीनें मला जागें केलें व असें कां ओरडतां म्हणून विचारलें. मीं तिला ही सर्व हकीकत सांगितली व सकाळींच रावसाहेब देव मामलत दार यांना हाच वृत्तांत कथन केला व मला वारंट ( आव्हान ) आलें आहे; आपण परवानगी द्या. उत्सवांतील ही येथील सर्व कार्यक्रम संपलें आहे. माझें मन मला येथें क्षणभरसुद्धा राहूं देत नाहीं असें त्यांना सांगितलें. श्री. देव यांनाही आश्चर्य वाटलें व आतां प्रत्यक्ष बाबांचेंच बोलावणें तुम्हांस आलें आहे, असें म्हणून त्यांनीं मला आनंदानें परवानगी दिली व मी तसाच तातडीनें शिरवळाहून निघून शिरडीस गेलों.

मीं हा सर्व वृत्तांत व हीं स्वप्नें त्याच श्रीसाईमहाराजांच्या चरणीं अर्पण केलीं आहेत." "

शिरडी,
चैत्र कृ. ६ गुरुवार,
शके १८५६
भावनामसंवत्सरे.

आपला नम्र सेवक
देशपांडे

# ग्रीक लोकांत भागवत धर्माचा प्रसार

( लेखकः—रावबहादूर वासुदेव अनंत प्रभू यांबर्डेकर, मुंबई )

( हंस साप्ताहिकावरून )

श्रीशुक्राचार्यप्रणित भागवतधर्माचा प्रवाह सुरू झाल्यापासून हीं कालपर्यंत तो भारतवर्षांत सर्वत्र चालू असलेला दिसून येतो. या पंथांतील साधनसौलभ्यामुळें परधर्मीयांनीही त्याचा स्वीकार केल्याचीं उदाहरणें आपल्या ता. १९ जुलैच्या लेखांत दिलेलीं आहेत. तसेंच एक उदाहरण दोन हजार वर्षांपूर्वीच्या ग्रीक राजसत्ताधाऱ्यांचें खालीं देत आहें. पण तें देण्यापूर्वी त्याची थोडी ऐतिहासिक माहिती प्रथम देतों.

मॅसिडोनिआचा बादशहा शिकंदर याच्या मृत्यूनंतर त्याच्या राज्याचे तीन विभाग होऊन तिसरा-सीरियाचा—भाग सेल्युकसच्या वांटयास आला. यांतच शिकंदरानें जिंकलेल्या आशिआ खंडांतील प्रदेशाचा समावेश झाला होता. तरी शिकंदरानें जिंकलेल्या भारतीय प्रदेशावर स्वारी करून पुनः एकदा तो स्वतः जिंकून घ्यावा, म्हणून खिस्ताब्दपूर्व ३०५ वर्षे सेल्युकसनें त्यावर चढाई केली. परंतु सुप्रसिद्ध मौर्यसम्राट चंद्रगुप्त याच्यापुढें त्याला हार खावी लागली. सेल्युकसच्या पश्चात् त्याचा मुलगा अँण्टिओकस हा दुर्बल असलेला पाहून पार्थिआ व बल्ख ( बॅक्ट्रिआ ) येथील ग्रीक अधिकारी अनुक्रमें अर्सिकेस व डायोडोटस हे स्वतंत्र झाले. त्या डायोडोटसच्या वंशांत मिनॅण्डर हा मोठा पराक्रमी व प्रसिद्ध राजा झाला ( खि. पू. १६० ). त्याचा राज्यविस्तार काबूल, सिंध, कच्छ, सुराष्ट्र, राजपुताना व पंजाब येथपर्यंत झाला होता. हा राजा मोठा न्यायी, लोकप्रिय व धार्मिक वृत्तीचा होता. पण त्याचा कल विशेषतः बौद्ध धर्माकडे होता. त्याच्या मृत्यूनंतर त्याचे भस्मावशेष लोकांनीं वांटून घेऊन त्यावर स्तूप उभारिले होते. मिनॅण्डरच्या पश्चात् अँण्टिआल्किडस हा तक्षशिला येथील राजसत्ताधारी असून त्यानें भागवतधर्माचा स्वीकार केला होता. त्यानें बेसनगर येथील काशीपुत्र भागभद्र नांवाच्या अधिकाऱ्याकडे दियकपुत्र भागवत (वैष्णव) हेलिओदोर याला आपला राजदूत म्हणून पाठवून तेथें श्रीविष्णूचा गरुड-

ध्वजस्तंभ तयार करवून उभारला ( ख्रि. पू. १४०–१३० दर्म्यान ). त्या स्तंभावर खालील लेख ब्राह्मी लिपींत कोरलेला आहे.

देवदेवस वासुदेवस गरुडध्वजे अयं
कारिते इअ हेलिओदरण भागवतेन
दिअसपुत्रेण तखसिलाकेन यानदूतेन
आगतेन महाराजस अंतिलिकितस
उपंता सकासं रणो कासिपुत्रस भागभद्रस
आतारस वसेन चतुदसेन राजेन वधमानस

या लेखाच्या वेळीं ॲण्टिआल्किडस ( अंतिलिकितस ) च्या राज्याचें १४ वें वर्ष चालू होतें, असा शेवटच्या ओळीचा आशय आहे.

उक्त लेखावरून दिसून येतें कीं, दोन हजार वर्षांपूर्वी पश्चिम भारतांत भागवत धर्माचा खूप प्रसार झाला होता. तो इतका कीं, तत्कालीन यवनराजे व यवन लोकही त्याचा अंगीकार करूं लागले होते.

भारतांत येऊन स्थायिक झालेले हे यवन लोक भारतीय धर्माबरोबर भारतीय नांवेंही धारण करीत असत, असें दिसून येतें. अशोकाच्या एका आदेश लेखांत अपरांत देशांत ( उत्तर कोंकणांत ) धर्मप्रसारार्थ पाठविलेल्या ग्रीक मनुष्याचें नांव " यवनधर्मरक्षित " असें आहे. तसेंच नासिक येथील एका गुहालेखांत "यवनधर्मदेव" व त्याच्या पुत्राचें "इंद्राग्निमित्र" अशीं नावें कोरलेलीं आहेत.

त्या काळीं यवनांची प्रबल राजसत्ता असल्यामुळें यावनी आचार-विचारांचें व सभ्यतेचें अनुकरण भारतवासीयांनीं करावें तें तर राहिलेंच, उलट जेते म्हणून आलेले ग्रीक राजे व त्यांचे लोक हेच भारतीय संस्कृतीचे अनुयायी बनूं लागले, असें व्हिन्सेंट स्मिथनेंच म्हटलें आहे, तें सार्थ आहे. भारतीय संस्कृतीचा हा प्रभाव पाहिला म्हणजे तिच्याबद्दल साभिमान आनंद व कौतुक वाटल्याशिवाय राहत नाहीं आणि आज, त्याच संस्कृतीचे अनुयायी म्हणविणाऱ्या भारतीय जनतेनें बेफाम उन्मार्गी बनून आपल्याच संस्कृतीचा सत्यनाश करण्यास प्रवृत्त व्हावें, हा कालमहिमा मोठा विचित्र दिसतो !

# जुलई महिन्याचें शिर्डीवृत्त

१ जुलई महिन्यांत श्रीसमाधि-दर्शनाकरितां व व्यासपौर्णिमेकरितां एकंदर १७५ भक्तजन येऊन गेले. ही भक्तमंडळी मुंबई, दादर, सुरत, बलसाड, अहमदनगर, बेलापूर, धुळें, चाळीसगांव, यवतमाळ, भुसावळ, नाशिक, पुणें, भांबुर्डा, बारामती, ठाणें, सान्ताक्रुझ, विलेपार्ले बेळगांव, कऱ्हाड, महाड, अकोला, नागपूर, आनापुरा द्वारदा, वछायली, ठाकुरकी, भरतपूर, कलकत्ता या ठिकाणाहून आली होती. त्यांपैकीं व्यासपौर्णिमेकरितां १०२ पाहुणे मंडळी आली होती. त्यांत मुंबई येथील रावबहादुर वासुदेव अनंत बांबर्डेकर; ठाण्याचे रा. रा. श्रीधर नारायण खारकर, वृद्ध मातुःश्री व कुटुंबसह सौ. गोपिकाबाई अनंत चित्रे, ठाणे; श्रीसाईनाथ बादशाही हॉटेलचे मालक रा. रा. गोपाळ विनायक टाकळीकर, पुणें हे १०।१२ मंडळीसह आले होते व बाबांची जुनी भक्त श्रीमती जनाबाई कदम, धुळें, बेळगांव येथील श्रीमती इंदिराबाई फडणीस, ह्याही होत्या. त्याचप्रमाणें रा. रा. दादाजी गोपीनाथ कुटुंबासह व रावसाहेब बा. वि. देव कुटुंबसह आले होते.

२ हा गुरुपौर्णिमेचा उत्सव साजरा करण्याचें काम नागपूर येथील श्रीमंत बुटी यांचें असल्यामुळें त्यांच्यातर्फे श्रीमंत पूर्णचंद्र गोपाळराव बुटी हे हजर होते. ह्या उत्सवाच्या वेळीं कांहीं तरी निमित्तानें पाहुणे मंडळीची थोडी तरी जेवणाच्या बाबतींत गैरसोय होते, ह्याकडे श्रीमंत बुटी यांनीं अधिक लक्ष घालावें. पाहुणेमंडळी इतक्या लांबून येतात, ते भोजनाकरितां येत नाहींत; तरी पण जेवणामध्यें सुधारणा करून जेवण साधें व स्वच्छ असलें तरी चालेल. त्यांना मिष्टान्न पाहिजे असें नाहीं.

३ उत्सव बुधवार ता. २५ जुलई रोजीं सुरू होऊन तो रविवार ता. २९ जुलई रोजीं समाप्त झाला. ह्या वेळीं रा. रा. शिरवळकर गवई हे

आजारी असल्यामुळें त्याचें सकाळचें गायन, रात्रीचें कीर्तन व भजन वगैरे कार्यक्रम उत्सवाकरितां आलेल्या पाहुणे मंडळीनें नेहमीप्रमाणें उरकून घेतली. श्रीसाईदासमंडळ, पुणें, चालक रा. रा. दत्तात्रय दामोदर रासने हे पुण्याहून २०।२५ मंडळीसह व भजनरत्न पंडितसह दरसालप्रमाणें आले होते. उत्सवांत पंडित यांचें मधुर व कोकिलेच्या आवाजाप्रमाणें मंजुळ गायन श्रीमंदिरामध्यें सकाळ-संध्याकाळ होत असे. त्याचप्रमाणें म्हैसूरदरबाराच्या आश्रयाखालील म्हैसूर येथील सनईवादनपटु रा. रा. बाबुराव देवळणकर यांनीं सनई-वादन केलें. जेवणाच्या पंक्तीच्या वेळींहीं हे सनईवादन करीत. पंडितांच्या गायनाच्या वेळीं, सनईवादनाच्या वेळीं पुण्याचे प्रसिद्ध तबलावादनपटु रा. रा. भास्करराव माचवे यांनीं तबल्याची साथ केली. त्याचप्रमाणें श्रीसाई-नाथ सेवामंडळ यांचे चालक रा. रा. शंकरराव गणपत शिंदे हे १५।२० मंडळीसह पुण्याहून आले होते. त्यांच्याबरोबर आलेले पेणचे तरुण गवई रा. रा. केळकर यांचें श्रीमंदिरामध्यें सकाळ-संध्याकाळ उत्तम गायन होत असे. कोल्हापुरचे रा. रा. माधवराव यांचें सतारवादन झालें. रा. रा. गोपाळ-राव जोशी यांनें हार्मोनियमवादन झालें. ही सर्व मंडळी आल्यानें उत्स-वास बरीच शोभा आली होती. काल्याचें कीर्तन दासगणू महाराजांचे शिष्य श्रीयुत बापाजी यांनीं शनिवारीं सकाळीं ता. २८।७।३४ रोजीं केलें. अहमदनगरचे ब्र. रा. किसनराम सुखलाल यांनीं श्रीपुढें ता. ७-७-३४ रोजीं गवईगायन केलें.

४ ह्या उत्सवांतील विशेष उल्लेख करण्याची गोष्ट ही कीं, रावबहादूर मोरेश्वर वि. प्रधान यांनीं संस्थानचे गवईबुवा आजारी असल्यामुळें व उत्सव उत्तम रीतीनें साजरा करण्याकरितां प्रसिद्ध हरिभक्तिपरायण जनुबाई यांचीं पार्ले येथील एक साईभक्त रा. रा. दाजी विठ्ठल सांबारे यांच्यामार्फत योजना अवघी अल्पकाळांत केली. याबद्दलची सविस्तर हकीकत श्री. बाबासाहेब तर्खड यांनीं मागील अंकांत दिली आहे यांनीं गुरुपौर्णिमेच्या दिवशीं रात्रीं सुमारें तीन तास गुरुभक्तीवर उत्तम कीर्तन केलें

व दुसऱ्या दिवशीं म्हणजे शुक्रवार ता. २७।७।३४ रोजीं श्रीपुढें समाधि-मंदिरांत रात्रीं संत मिराबाई हिचें आख्यान लावलें होते. ह्या वनुबाईंच्या येण्यानें उत्सवास जास्त शोभा आली होती. ह्यांची साथ विष्णुदास ऊर्फ विष्णु रामचंद्र दुखंडे हे करितात. त्यांचाही आवाज मोठा पहाडी असून गोड आहे व त्यांच्या साथीनें वनुबाईस फारच मदत होते. कोणा-लाही सहज समजेल अशा रीतीनें वनुबाई निरूपण सांगतात. त्या संतांचीं आख्यानें फार प्रेमळ रीतीनें सांगतात. त्यांचा आवाज गोड व मधुर असल्यानें दासगणुमहाराजांच्या भक्तिरसानें भरलेल्या आख्यानांना कीर्तनांत भक्तिरसाचा पूर येऊन सर्व श्रोते मंडळी भक्ति-रसाच्या आस्वादांत तल्लीन होत असे. शिर्डी गांवच्या मंडळीलाही त्यांचें कीर्तन फार आवडलें. शिर्डी गांवच्या आजूबाजूच्या खेड्यांतील मंडळी त्यांच्या कीर्तनाकरतां शुक्रवार ता. २७।७।३४ रोजीं येणार होती; परंतु शिर्डी येथें मेघराजानें कृपा केल्यामुळें शुक्रवार रोजीं संध्याकाळीं पावसास सुरवात झाल्यामुळें ती मंडळी कीर्तनास आली नाहीं; त्यामुळें कीर्तन श्रीमंदिरांत करावें लागलें. त्यांचा हेतु होता कीं, एक कीर्तन समाधीपुढें करावें. त्याप्रमाणें पाऊस पडल्यानें श्रीद्वारकामाईंत न होतां समाधिमंदिरांत होऊन श्रींनीं त्यांचा हेतु पूर्ण केला व तेथें कीर्तन चाललें असतां त्यांनीं म्हटलें, 'श्रीसाई प्रत्यक्ष येथें आहेत.' हें म्हणण्याची खोटी ! एवढ्यांत गर्दीतून एक काळा मोठा कुत्रा समाधीच्या बाजूनें येऊन त्यांच्या अंगाजवळून बाहेर पुढील दरवाजानें निघून गेला.

## ५ श्रींस गुरुपौर्णिमेनिमित्त अर्पण केलेल्या जिनसा वगैरे:

१ सौ. गोपिकाबाई अ. चित्रे, ठाणें, सफेद जरीचें उपरणें.

२ रा. रा. विठ्ठल बाळाजी कुंभकर्ण, अहमदनगर, ३ वार इमिटेशन वायल.

३ येकनाथ प्रल्हाद सुगांधकर, पुणें, तांबडा अंजनी रुमाल.

४ श्रीसाईदास मंडळ, पुणें, हस्तें रा. रा. दत्तात्रय दामोदर रासने; जरीकांठी हिरवा शेला.

५ श्रीसाईनाथ सेवामंडळ, पुणें, हस्तें रा. रा. शंकरराव गणपत शिंदे, जरीकांठी धोतर.

६ रा. रा. दादाजी गोपीनाथ जोशी, दादर, मुंबई, श्रींच्या द्वारकामाईमध्यें लावण्याकरितां पेट्रोमॅक्स कंदील.

७ रा. रा. काशीनाथ शंकर दुबे, पुणे, जरीचा तांबडा पीतांबर.

८ महादेव गोपाळ जोशी, दादर, मुंबई, सोन्याच्या चार जुवत्या, भार १ मासा.

९ श्रीमती दुर्गाबाई देशवंडीकर, जळगांव, रेशमी धोतर पान व पंचा.

१० श्रीमती गंगूबाई दाणी किन्हीकर, जळगांव, रेशमी धोतरपान.

रा. रा. सुंदरराव दिनानाथ नवलकर व सौ. शान्ताबाई सुं. नवलकर, मुंबई, यांनीं श्रींच्या द्वारकामाईंत श्रींस दक्षणा देण्यासाठीं लहान लोखंडी तिजोरी अर्पण केली. ता. २६।७।१९३४.

१२ रा. रा. शिवराम वासुदेव फडणीस, कलकत्ता श्रींस नैवेद्य केला व रु. १० कायमफंडास दिले.

१३ रा. रा. त्रिंबक विठ्ठल कुंभकर्ण, अहमदनगर, हिरवी सुती चादर.

१४ श्रीमती दुर्गाबाई देशवंडीकर, जळगांव, श्रींस रेशमी धोतर पान व एक शुभ्रकांठी पंचा.

१५ श्रीमती गंगूबाई दाणी किन्हीकर, जळगांव, श्रींस १ रेशमी धोतरपान.

१६ श्रीमती पिरोजबाई रामराव कोठारे, मुंबई, यांनी कै. रामकृष्ण श्रीकृष्ण नवलकर यांच्या शिर्डी येथील वाड्यांतील निंबवृक्षाखालील श्रींच्या पादुकांजवळ दिवाबत्ती करण्याकडे खर्चाकरितां त्यांचे पति कै. डॉ. रामराव शामराव कोठारे, जशी पूर्वी खर्चाकरितां रक्कम देत होते, त्याप्रमाणें ता. १ जुलई १९३४ पासून रु. २ देण्याची सुरवात केली आहे.

६ गुरुपौर्णिमेनिमित्त श्रींस पुष्कळ भक्तमंडळीनें गुरुपौर्णिमेच्या दिवशीं व दुसऱ्या दिवशीं अभिषेक व नैवेद्य केले. अभिषेकांची संख्या वाढत चालल्यामुळें सर्व अभिषेक एकाच दिवशीं उत्सवाचा व नैत्यिक कार्यक्रम करावयाचे असतात त्यामुळें, होणें अशक्य होत चाललें आहे. म्हणून कांहीं अभिषेक दुसऱ्या दिवशीं करावे लागतात. कांहीं भक्तांकडून उत्सवांत अभिषेक व नैवेद्य करण्याबद्दल मनिऑर्डरी संस्थानच्या ऑ. चिटणीस किंवा ऑ. खजिनदार यांच्या नांवें उत्सवानंतर येतात. तरी, भक्तांनीं उत्सव सुरू होण्यापूर्वी निदान चार दिवस पूर्वी कळवावें, म्हणजे त्यांचे मनोगतीप्रमाणें सर्व कांहीं करण्याचे संस्थानकडून प्रयत्न केले जातील.

७ शिर्डी संस्थानकडे भक्तांकडून धर्मकृत्य-कार्याकरितां, किंवा देणगी म्हणून ज्या रकमा येतात, त्यांस संस्थानांतून ऑ. चिटणीस किंवा ऑ. खजिनदार यांजकडन छापील पावती देण्यांत येते. ज्यांस छापील पावती मिळत नसेल, त्यांनीं ऑ. चिटणीस यांजकडे त्याबद्दल कळवावें. संस्थानांत जी रक्कम जमा होते, त्याबद्दलच छापील पावती देण्यांत येते. ज्या भक्तास छापील पावती मिळाली नसेल, त्यांनीं श्रीसाईबाबांच्या नांवानें दिलेली रक्कम अथवा जिन्नस संस्थानांत जमा झालेले नाहींत असें समजावें व त्या रकमेबद्दल किंवा जिनसांबद्दल संस्थान जबाबदार नाहीं. संस्थानकमिटीनें शिर्डी येथें संस्थानचे किंवा श्रीसाईमंदिराचे असे व्यवस्थापक म्हणून कोणाची नेमणूक केलेली नाहीं किंवा जागा नेमिली नाहीं, हें भक्तमंडळीनें लक्षांत ठेवावें. शिर्डी येथील संस्थानच्या नोकरास प्रत्येकाचीं कामें ठरवून दिलीं आहेत; तीं माहिती श्रीसाईलीला मासिकाचा जोड अंक २–३–४ अ. वैशाख-वैशाख-व जेष्ट, वर्ष ११ शके

१८५६ या अंकांत दिली आहे. शिर्डी संस्थानकडे पाठविलेल्या रकमा, जिनसा वगैरे, पाठविल्याबद्दलचा उल्लेख श्रीसाईलीला मासिकांत करण्यांत येतो. कांहीं भक्तमंडळीस त्यांनीं संस्थानांत म्हणजे ऑ. खजिनदार किंवा ऑ. चिटणीस यांजकडे रक्कम न भरतां दुसऱ्या कोणाकडे भरली असतां त्याबद्दलची छापील पावती संस्थानकडून न मिळाल्यामुळें त्याबद्दलची तक्रार आल्यामुळें ही वरील सूचना भक्तांस देण्याचें कारण झालें आहे. जर त्यांची रक्कम संस्थानांत खात्रीनें जमा झाली असती, तर त्यांस छापील पावती मिळालीच असती. तर ह्यापुढें ज्या कोणास श्रींस रकमा, देणगी वगैरे पाठवावयाच्या असतील, त्या संस्थानचे ऑ. खजिनदार रा.रा. रा. आ. तर्खड, ५१ ई पाली रस्ता, ग्वार, मुंबई २१, किंवा ऑ. चिटणीस सुं. टि. नवलकर, साईभुवन, १४१ प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २, या पत्त्यावर पाठवाव्यात. त्याबद्दलची छापील पावती संस्थानकडून पाठविण्यांत येईल.

८ शिर्डी येथील नवलकर वाड्याचे मालक (पूर्वी साठे यांचा वाडा ) रा. रा. रामकृष्ण श्रीकृष्ण नवलकर, अॅडव्होकेट ओ. एस. व जुने साईभक्त, हे मधुमेहाच्या विकारानें काळपुळी होऊन शनिवार ता. १० जुलई १९३४ रोजीं पहाटेस कैलासवासी झाले. श्रीसाई त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

९ शिर्डीहून आलेल्या बातमीवरून कळतें कीं, संस्थानचे वयोवृद्ध गवई रा. रा. गणेश गोपाळ देशपांडे उर्फ शिरवळकर हे रविवार ता. ५ ऑगस्ट १९३४ रोजीं कैलासवासी झाले. ते साईबाबांची नोकरी प्रेमानें सकाळपासून रात्रींपर्यंत करीत असत. श्रीसाई त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

१० रा. रा. तात्या गणपत पाटील कोते, शिर्डीसंस्थानचे एक विश्वस्त यांची मुलगी सौ. कृष्णाबाई हिने जेष्ठ शु॥ १० शके १८५६ ता. २२-६-१९३४ शुक्रवार रोजीं संध्याकाळच्या सुमारास श्रीद्वारकामाईतील श्रींची तसबीर ग्रामवत झालेली पाहिली. तिच्या सोबत दुसरी एक मुलगी कु. पुंजाबाई परटीण होती.

# शिर्डी-संस्थानसमाचार

## शिर्डी-संस्थानकमिटी

११ शिर्डी-संस्थानकमिटीची सभा शिर्डी येथें गुरुवार ता. २६।८।३४ रोजीं भरली होती; त्या वेळीं संस्थानचे विश्वस्त रावबहादुर मो. वि. प्रधान, रा. रा. बा. वि. देव, रा. रा. तात्या गणपत पाटील, कमिटीचे सभासद रा. रा. माधवराव ब. देशपांडे, रा. रा. ब. ना. गोरक्षकर, रा. रा. गो. का. गाडगीळ, ऑ. खजिनदार रा. रा. रा. आ. तर्खड व ऑ. चिटणीस सुंदरराव दि. नवलकर व ऑ. दुय्यम खजिनदार रा.रा. र. भा. पुरंदरे हे सभासद हजर होते.

१२ पुढील तीन वर्षांकरितां कमिटीनें कमिटीचे कार्यवाहक खालील सभासद नेमिले आहेत. ह. भ. प. दासगणुमहाराज—अध्यक्ष; रा. रा. सुंदरराव दि. नवलकर—ऑ. चिटणीस; रा. रा. रा. आ. तर्खड, ऑ. खजिनदार, रा. रा. बापूराव रा. बोरावके, ऑ. दुय्यम चिटणीस, व रा. रा. र. भा. पुरंदरे, ऑ. दुय्यम खजिनदार.

१३ पुढील तीन वर्षांकरितां शके १८५६ ते १८५८ नवीन कमिटीचे सभासद व कार्यवाहक.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | रावबहादुर मोरेश्वर वि. प्रधान तहाहयात विश्वस्त ( ट्रस्टीज ) | | सभासद |
| २ | रा. रा. तात्या गणपत पाटील कोते | ,, | ,, |
| ३ | रा. बाळकृष्ण वि. देव | ,, | ,, |
| ४ | रावबहादुर सखाराम ब. धुमाळ | ,, | ,, |
| ५ | रा. रा. वासुदेव नारायण चांदोरकर | ,, | ,, |
| ६ | ह. भ. प. दासगणुमहाराज | | अध्यक्ष |
| ७ | रा. रा. माधवराव ब. देशपांडे | | |
| ८ | श्रीमंत केशवराव गो. बुटी | | |

९ रा. रा. यशवंतराव ज. गाळवणकर
१० ,, गोविंद का. गाडगीळ
११ ,, वसंतराव ना. गोरक्षकर
१२ ,, रामचंद्र आ. तर्खड, ऑ. खजिनदार
१३ ,, रघुवीर भा. पुरंदरे, ऑ. दुय्यम खजिनदार
१४ ,, सुंदरराव दि. नवलकर ऑ. चिटणीस
१५ ,, बापूराव रा. बोरावके ऑ. दुय्यम चिटणीस

१४ शके १८५४ चा शिर्डीसंस्थानचा कथन, निवेदन व आढावा कमिटीनें मंजूर केले.

१५ मागील सालाप्रमाणें खालील कमिटीच्या सभासदांची तत्पर व साधारण कामें वेळेवर करण्याकरितां संस्थानकमिटीची पोटकमिटी तीन वर्षांकरितां नेमली. खालीलप्रमाणें तिचे सभासद आहेत:—

१ रावबहादूर मोरेश्वर वि. प्रधान, २ रा. रा. बाळकृष्ण वि. देव, ३ रा. रा. रा. आ. तर्खड, ४ रा. रा. यशवंत ज. गाळवणकर, ५ रा. रा. रघुवीर भा.पुरंदरे, ६ रा.रा. व. ना. गोरक्षकर व ७ रा. रा. सुंदरराव दि. नवलकर.

१६ शिर्डी येथील संस्थानच्या जागेवर कांहीं भक्तमंडळी कांहीं अटींवर घरें बांधून देण्यास तयार आहेत; याबद्दलचा विचार तूर्त कांहीं कारणास्तव तहकूब केला आहे, असें कमिटींत ठरलें. श्रीसाईबाबा यांची संगमरवरी दगडाची मूर्ति तयार करण्याबद्दलच्या बाबतींत रावबहादूर सखाराम बळवंत धुमाळ यांजकडून श्रीमंत प्रतिनिधि औंधसरकार हे श्रीसाईबाबांची मूर्ति तयार करून देणार आहेत असें पत्र आल्यावरून विचार करण्यांत आला.

## १३ वी वार्षिक सभा

१७ शिर्डीसंस्थानच्या भक्तमंडळाची १३ वी वार्षिक सभा शिर्डी येथें गुरुवार ता. २६।७।१९३४ रोजीं संध्याकाळीं ६ वाजतां दीक्षित-वाडयांत भरली होती. त्या सभेंत शके १८५५ चा आहावाल व संस्थानचें कथनवृत्त मंजूर झालें. शके १८५६ सालाकरितां रा. रा. जिवाजी कृष्ण परुळकर, जे. पी. यांस संस्थानचे ऑ. हिशोबतपासणीस नेमिलें. त्यांनीं शके १८५४ चा हिशोब वेळेवर तपासून दिल्याबद्दल संस्थाननें त्यांचे आभार मानले.

१८ संस्थानचे एक विश्वस्त रावबहादुर सखाराम व. धुमाळ, वकील नाशिक यांच्या प्रकृतीस आराम वाटत नसल्यामुळें त्यांस कमिटीच्या सभेस हजर राहतां आलें नाहीं; आतां त्यांची प्रकृति श्रीसाईकृपेनें सुधारली आहे.

साईभुवन,
१४१ प्रिन्सेस स्ट्रीट,
मुंबई, ता. ८ ऑगस्ट १९३४

सुंदरराव दि. नवलकर,
ऑ. चिटणीस,
शिर्डी संस्थानकमिटी

श्रीसाईबाबा

# आगस्ट १९३४ चें शिर्डीवृत्त

ह्या महिन्यांत शिर्डी येथे श्रींच्या समाधिदर्शनाकरितां १४ सतप्रेमी बांधव येऊन गेले. ह्या महिन्यांत पाऊस असल्यामुळें व गेल्या महिन्यांत गुरुपौर्णिमेचा उत्सव झाल्यामुळें व श्रावण मास सुरू असल्यामुळें मंडळी कमी आली. ती अकोला, खामगांव, जेजुरी, पारनेर, अहमदनगर, नवसरी व मुंबई येथून आली होती. त्यांत सर्व अबालवृद्धांस माहित असलेले श्रीगोभक्त चौंडेमहाराज हे त्यांच्या शिष्यांसह आले होते.

१ नगर येथील इन्कमटॅक्स ऑफिसर रा. रा. विनायक वामन ऊर्फ दादा राळे यांनीं श्रींस ता. ३०।८।३४ रोजीं अभिषेक केला. कुर्ला येथील वासुदेव सांवळाराम शिरोडकर यांनीं कळविल्यावरून श्रींस दर श्रावण सोमवारीं नवसाप्रीत्यर्थ अभिषेक केले.

२ मुंबई-माहिमबाजार येथील सौ. सोनाबाई लक्ष्मण विठ्ठल नाडकर्णी यांनीं कळविल्यावरून श्रींस ता. २५।८।३४ रोजीं अभिषेक केला.

३ श्रीगोभक्त बाळकृष्ण चौंडेमहाराज आपल्या शिष्यगणांसह ता. २९।८।३४ रोजीं श्रींच्या दर्शनास येऊन गेले. त्यांनीं शेरावहींत खालील मजकूर लिहिला. पंचामृतासाठीं गाईचें तूप, दुध दही असावें व

श्लोक

॥ साईबाबाच्या आश्रमी ॥ एक असावी दुग्धवती गौतमी ॥

॥ त्या योगें सज्जनाश्रमीं ॥ आत्मारामी सुख पावे॥

हेंच सज्जनांचें भूषण॥ज्यासाठीं अवतरले नारायण॥

॥ ते नसतां म्हणती स्मशान ॥ व्यासो नारायण भारती ॥

(गोवशरीणी)

बाळकृष्ण चौंडेमहाराज, अहमदनगर

# श्रीगोकुल-अष्टमी उत्सव

४ शिर्डी येथील श्रीसमाधिमंदिरांतील गोकुळअष्टमीचा उत्सव शिर्डी येथील गांवकरी लोकांनी साजरा करण्याबद्दलची जबाबदारी घेतली आहे, व त्याप्रमाणें ते आजपर्यंत करीत आले आहेत. परंतु यंदा गांवांत कांहीं निमित्यानें दुफळी झाल्यानें गांवकरी लोकांनीं ह्या उत्सवांत जसें मन घालावें तसें घातलें नाहीं. कारण दर वर्षाप्रमाणें यंदा उत्सवांतील मुख्य कार्यक्रमांपैकीं नामसप्ताहाचा कार्यक्रम झाला नाहीं, ही गोष्ट गांवकरी लोकांस भूषणावह नाहीं. इतर बाबतींत एकामेकांबरोबर कितीही तेढ असो, परंतु धर्माच्या बाबतींत सर्वांनीं आपले मतभेद विसरून एकत्र झालें पाहिजे. अशा रीतीनें एकत्र होण्यानें आपसांतील तेढीस जागा राहणार नाहीं व सर्व गांव आनंदानें व सलोख्यानें नांदू लागेल व त्यामुळें गांवाची भरभराट होण्यास उशीर लागणार नाहीं. गांव शेतकरी लोकांचा असल्यामुळें व मागील तीनचार वर्षें शेतीचें उत्पन्न कमी आल्यानें व शेतीच्या उत्पन्नाचे भाव कमी झाल्यानें गांवची सांपत्तिक स्थिति असावी तशी नसल्यानें ह्या उत्सवाच्या खर्चाकरितां गांवकरी यांच्या मागणीवरून संस्थान-पोटकमिटीनें रु. २५ ह्या वर्षापुरतेच मंजूर करून गांवकऱ्यांच्या वतीनें रा. रा. तात्या पाटील यांजकडे दिले.

५ जन्म-अष्टमीच्या दिवशीं पुण्याचे रा. रा. दत्तात्रय दामोदर रासने ह्यांचें ह्या उत्सवांत श्रींपुढें भक्तिरसपूर्ण गायन सुमारें दीड तास झालें. नंतर एक तासपर्यंत लिजिम-खेळ व टिपऱ्यांचा गोफ विणण्याचा नाच झाला. श्रींस अभिषेक केल्यानंतर रा. रा. बापाजी लक्ष्मण कुळकर्णी यांनीं कीर्तन करून श्रीकृष्ण भगवान् यांचा मध्यान्ह रात्रीं जन्म-उत्सव केला. सर्वांस सुंठीचा प्रसाद वांटला व नंतर सुमारें ८० मंडळीस चहा दिला. दुसऱ्या दिवशीं ता. १।९।३४ रोजीं म्हणजे गोकुळअष्टमीच्या

दिवशीं दीड मण तांदुळाचा भात व दोन पायली तुरीची डाळ व दोन पायली मसुरीची डाळ मिळून आमटी केली. सुमारें ८०० मंडळी ब्राह्मण मंडळीसह जेवली. रात्रीं पालखीची मिरवणूक ११ वाजेपर्यंत झाली. ता. २।९।३४ रोजीं रविवारीं सकाळीं १०॥ ते १२ वाजेपर्यंत काल्याचें कीर्तन रा. रा. बापाजी कुळकर्णी यांनीं करून काला केला. वरील एक महत्त्वाची गोष्ट नामसप्ताहशिवाय करून उत्सव आनंदात पार पडला.

## जिनसा, देणग्या वगैरे आल्या याचा तपशील:---

६ कै. गणेश गोपाळ देशपांडे शिरवळकर, संस्थानचे मवई. यांचें कुटुंब श्रीमती सरस्वतीबाई यांनीं पितळी पातेलें, तांब्याची परात व तांब्याचें तपेली अशीं भांडीं दिलीं.

७ रा. रा. व्यंकट लिंबाजी कोंडल, स्थळ, जि. कुलाबा, कायम फंडास रु. ५; रा. रा. नामदेव निकल पोलिस, नाईक, पुणे नं. ४ हे रु. ५ वर्गणी देऊन शके १८५६ करितां शिर्डी संस्थानचे भक्तमंडळाचे सभासद झाले.

८ रा. रा. डी. एम राजा, दादर, मुंबई, यांनीं त्यांचे पुतणे क्षयाच्या आजारांतून उठले म्हणून त्यांच्या नवसाप्रीत्यर्थ श्रीद्वारकामाईंत श्रावण शु. १५ रोजीं वत्ती लावण्याकरितां १ रु. दिला.

९ शिर्डी संस्थान पोटकमिटीची सभा सान्ताक्रुझ येथें रावबहादुर मोरेश्वर वि. प्रधान यांच्या बंगल्यांत ता. ५।८।३४ रविवार रात्रीं संध्याकाळीं भरली होती. त्या वेळीं रावबहादुर मो. वि. प्रधान, रा. रा. र. भा. पुरंदरे, रा. रा. ब. ना. गोरक्षकर, रावसाहेब वा. वि. देव, रा. रा. सुं. दि. नवलकर हजर होते. रा. रा. तात्या पाटील मार्फत शिर्डी येथील गांवकरी यांनीं संस्थानकमिटीकडे उत्सवाप्रीत्यर्थ कांहीं वर्गणी मिळावी म्हणून रावसाहेब वा. वि. देव यांजकडे कळविल्यावरून पोट-कमिटीनें ह्या वर्षाकरितांच रु. २५ मंजूर केले व रा. रा. तात्या पाटील

यांजकडे देण्याबद्दल ठरलें. पुण्यतिथिउत्सवाचा कार्यक्रम ठरविल्यावर व इतर कामें आटोपल्यावर कमिटीचें काम संपलें.

१० श्रावण शु. ११ ता. ११-८-३४ रोजीं श्रीद्वारकामाईंतील पेटींत जमा रु. १-४-०, श्रीसमाधिमंदीर पेटींत जमा रु. १५-३-०.

११ शिर्डी येथें हवापाणी उत्तम आहे व पाऊसही बरा आहे.

साईभुवन,
१४१ प्रिन्सेस स्ट्रीट,
मुंबई, ता. ८ सप्टेंबर

सुंदरराव दि. नवलकर,
ऑ. चिटणीस, शिर्डी संस्थानकमिटी

## श्रीसद्गुरुसाईबाबांचा
# पुण्यतिथिउत्सव

शिर्डी, ता. ९. सप्टेंबर १९३४

श्री. सा. न. वि. वि. आधुनिक संतचूडामणि सच्चिदानंद श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबामहाराज, संस्थान शिर्डी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर यांची १६ वी पुण्यतिथि येत्या आश्विन शु. ११ शके १८५६ गुरुवार (ता. १८–१०–३४) रोजीं श्रीक्षेत्र शिर्डी येथें महाराजांच्या मंदिरांत होणार आहे. तरी या समयीं आपण कृपा करून आपल्या कुटुंबांतील बाळ-गोपाळांसह व मित्रमंडळीसह श्रींच्या तीर्थप्रसादास अवश्य यावें अशी नम्र विनंती आहे.

**सुंदरराव दि. नवलकर,**
ऑ. चिटणीस,
साई भुवन, १४१ प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई.

**रा. आ. तर्खड,** ऑ. खजिनदार,
५१ E पार्लीरस्ता, खार-मुंबई २१.

**बापुराव रा. बोरावके,**
ऑ. दुय्यम चिटणीस.

**रघुवीर भा. पुरंदरे,**
ऑ. दु. खजिनदार.

आपले नम्र साईदास,
**मोरेश्वर विश्वनाथ प्रधान,**
**तात्याजी गणपत पाटील कोते,**
**बाळकृष्ण विश्वनाथ देव,**
**सखाराम बळवंत धुमाळ,**
**वासुदेव नारायण चांदोरकर,**
**श्रीसाईबाबा शिर्डी संस्थानचे**
विश्वस्त (ट्रस्टीज)

# उत्सवाचा कार्यक्रम

## आश्विन शु॥ ९ शके १८५६ बुधवार ता. ( १७-१०-३४

प्रारंभदिन

पहाटे ४ ते ५--सनई-चौघडयासह नित्याप्रमाणें काकड-आरति.

सकाळीं ५ ते ८—श्रींचे समाधीवर रुद्राभिषेक, पवमानाभिषेक व समाधीपुढें सनई-चौघडयाची नित्याप्रमाणें हजेरी.

,, ८ ते १०—श्रींचे समाधीस मंगल स्नान, वस्त्रपरिधान, षोडशोपचार पूजा, श्रींच्या प्रधान लेंडीबागेंतील पुष्पहार व तुलसी, दुर्वासमर्पण.

,,१२ ते १--दुपारची नैत्यिक आरती.

,, १ ते ३—पाहुणे मंडळीचें भोजन

,, ३ ते ४—श्रींचे समाधीपुढें नैत्यिक पुराण.

,, ४ ते ५—श्रींचे समाधीपुढें श्री.बाळा भोपटकर यांचें नैत्यिक चकी भजन.

,, ५ ते ६—सीमोल्लंघन.

सायंकाळीं ६ ते ७—सायंकाळची नैत्यिक आरति.

,, ७ ते ८—पाहुणेमंडळीचें रात्रीचें भोजन किंवा फराळ.

रात्रीं ८ ते ९--रथाची मिरवणूक.

,, ९ ते ११ नैत्यिक शेजारती व भजन.

## आश्विन शु॥ ११ गुरुवार (ता. १८-१०-३४) पुण्यतिथिदिन

पहाटे ४ ते ५—वरप्रमाणें

सकाळीं ५ ते ८—वरप्रमाणें.

,, ८ ते ९—भिक्षा,व श्रींच्या समाधीस मंगल स्नान,वस्त्रपरिधान वगैरे.

,, ९ ते १२—श्री. बाळासाहेब देव यांचें श्रीसाईबाबा पुण्यतिथि-आख्यान, कीर्तन व दुपारची नित्याची आरती.

दुपारीं १२ ते २—पुण्यतिथि-आराधनविधि.

,, २ ते ४—तीर्थप्रसाद, भोजन व फराळ.

,, ४ ते ५–श्रींचे समाधीपुढें नैत्यिक पुराण.

,, ५ ते ६–,, ,, चक्री भजन, व शिर्डी संस्थान-कमिटीची सभा.

सायंकाळीं ६ ते ७–सायंकाळची नित्य आरती.

७ ते ८–इतर मंडळीचें भोजन व रात्रीचें भोजन व फराळ.

रात्रीं ९ ते १२–रथाची मिरवणूक, शेजारती व गारुड.

## आश्विन शु॥ १२ शुक्रवार ( ता. १९-१०-३४ )

पहांटे ५ ते ६–घरप्रमाणें काकडआरती.

सकाळीं--६ ते ८ वरप्रमाणें रुद्राभिषेक व पवमानाभिषेक.

,, ८ ते १० श्रींचे समाधीस मंगल स्थान, वस्त्रपरिधान, पूजा वगैरे.

,, ११ ते १२ श्रींची दुपारची नैत्यिक आरती.

दुपारीं १२ ते २–भोजन.

,, २ ते ३–चक्री भजन.

,, ३ ते ५–श्रींच्या समाधीपुढें श्री. बाळासाहेब देव यांचें श्रीज्ञानेश्वरी पुराण.

सायंकाळीं ६ ते ७– सायंकाळची नैत्यिक आरती.

,, ७ ते ८– पाहुणे मंडळीचें रात्रीचें भोजन.

रात्रीं ९ ते ११–पालखीची मिरवणूक व शेजारती.

## आश्विन शु॥ १३ शनिवार ( ता. २०-१०-३४ ) काला

पहांटे ५ ते ६– काकडआरती.

सकाळीं ६ ते ८– श्रींचे समाधीवर रुद्राभिषेक व पवमानाभिषेक.

,, ८ ते १०–श्रींच्या समाधीस मंगल स्थान, वस्त्रपरिधान, पूजा वगैरे.

,, १० ते १२–काल्याचें कीर्तन.

दुपारीं १२ ते १– दुपारची नैत्यिक आरती.

,, १ ते ३– भोजन.

,, ३ ते ५– श्रींच्या समाधीपुढें श्री. बाळासाहेब देव यांचें ज्ञानेश्वरी पुराण.

,, ५ ते ६– चक्री भजन.

सायंकाळीं ६ ते ७– सायंकाळची नैत्तिक आरति.

" ७ ते १०–भंडारा भोजन.

रात्रीं १० ते १२–शेजारती व भजन.

टीपः—वरील कार्यक्रमामध्यें जरूरीप्रमाणें फेरफार केला जाईल.

## श्रीसाईभक्तांस विज्ञाप्ति

समर्थ श्रीसाईबाबा यांच्या लीलात्मक घडलेल्या गोष्टी व श्रीसाईबाबां बद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव शिर्डी संस्थान कमिटीनें चालविलेल्या श्रीसाईलीला मासिकांत प्रसिद्ध व्हावे म्हणून कोणास पाठविण्याची इच्छा असल्यास त्यांनीं रा. रा. **रा. आ. तर्खड**, संपादक, श्रीसाईलीला मासिक ५१ E पाली रस्ता, खार–मुंबई २१ यांजकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

ज्या भक्तांस **श्रीसाईसच्चरित** किं. रु. ३॥, पाहिजे असेल त्यांनीं याप्रमाणें कळवावें.

**सुंदरराव दि. नवलकर,**
ऑ. चिटणीस, शिर्डी संस्थान कमिटी

( सूत्र नं. ७७ व ७८ उपलब्ध नाहींत. )

## सूत्र ७९ ॥ सर्वदा सर्वभावेन निश्चिंतैर्भगवानेव भजनीयः ॥

**आर्या**:—॥ प्रापंचिक चिंतेचा, त्याग करुनि सर्वदा मनोभावें ॥
॥ भगवद्भजन करावें, मुख्यार्थ असा असे वदे **साई** ॥

**विवरण**:—ऐकांतिक भजनानें भगवत्प्राप्ति अनायासें होते ( भ. गी. ८–१४ ) व अशा भक्ताच्या पोटापाण्याची तजवीज स्वतः ईश्वरच करितो, ( भ. गी. ९–२२ ) ह्या दोन गोष्टी ध्यानांत ठेवाव्या, आणि निश्चिंत होऊन सदासर्वकाळ ईश्वरभजनानंदांत निमग्न असावें. अशा एकनिष्ठेचें फळ काय मिळतें, तें श्रीतुकाराममहाराजांनीं स्वतः जगाला प्रत्यक्ष दाखवून ठेविलें असतांही, त्याची खरी किंमत कोणासच कळत नसून त्यांचें उदाहरण जगाला निष्फळ झालें आहे ! पुत्रभार्यादिकांच्या वियोगामुळें कांहीं पुरुष जसे महिनेच्या-महिने तळमळत असतात, तशी ईश्वरप्राप्तीबद्दल फक्त आठपंधरा दिवस तरी तळमळ लागूं द्या, आणि मग ईश्वरप्रसाद मिळतो का नाहीं तें पाहा, अशा अर्थाचे श्रीरामकृष्णपरमहंसाचे प्रत्यक्षानुभवजन्य उद्गार जगाला ॥ "**नळीं फुंकिली सोनारें ॥ इकडून तिकडे गेलें वारें ॥**" असेच फलदायी होतात ! !

## सूत्र ८० ॥ सङ्कीर्त्यमानः शीघ्रमेवाविर्भवति, अनुभावयति भक्तान् ॥

**आर्या** ॥ ऐशा भजनें तोषुनि, प्रकटचि होतो त्वरें स्वभक्तांतें ॥
॥ आत्मानुभवानंदहि, देतो भक्तास **सांई**रूपानें ॥

**विवरण**—अनुभवी पुरुषांनीं तर्कवितर्क न करितां आत्मानुभवी संतांच्या परोपकार उक्तीवर श्रद्धा ठेवूनच ज्ञानप्राप्तीच्या प्रयत्नास सुरवात करा-

वयाची असते. अशी श्रद्धा नसेल तर कोणतीच व्यावहारिक विद्याही प्रा
होणार नाही. कोष्ट्याला माग पाहिजे. सुताराला वाकस, किकरें, करवत इत्या
साधनें पाहिजेत. चांभाराला आरी, इंगा वगैरे सामान पाहिजे. आणि
साधनांशिवाय प्रत्येकाला तज्ज्ञ गुरुही लागतोच. चांगला अभ्यास केल
शिवाय नुसत्या भाकरीसुद्धा कोणासच करतां येत नाहींत. मग साधनचतुष्ट
शिवाय अथवा सकल योगांशिवाय आणि तज्ज्ञ गुरूशिवाय आत्मज्ञान क
व्हावें, तें समजणें फार कठीण आहे. महात्म्या जीवन्मुक्तांच्या स्वानुभवावर
सूत्रार्थ खरा आहे, अशी श्रद्धा ठेवणें अवश्य आहे.

## सूत्र ८१ ॥ त्रिसत्यस्य भक्तिरेव गरीयसी, भक्तिरेव गरीयसी, भक्तिरेव गरीयसी ॥

**आर्या** ॥ भक्तिच थोर असे ही, भक्तिच ती थोर थोर ही भक्ति ॥
॥ वदले त्रिवार नारद, **साई**रूपी तयां असो प्रणती ॥

**विवरण**—अद्वैतज्ञानमार्गप्रस्थापक श्रीमदाद्यशंकराचार्यांचीं भक्ति
स्तोत्रें अनेक आहेत; आणि ते नित्य पंचायतनपूजेचेही प्रस्थापक आहेत
तेव्हां अर्थात् ते महाज्ञानी **भगवद्भक्त** होते. (भ. गी. ७—१६ ते १
असें म्हणणें प्राप्त आहे. श्रीज्ञानेश्वर, श्रीतुकाराम, श्रीरामदास वगैरे
अर्वाचीन महाज्ञानी संत तर केवळ भक्तिमार्गप्रस्थापकच होते. ह्याप्रमाणें
निपत्कालापासून तों थेट प्रस्तुत कालापर्यंत झालेल्या सकल महात्म्यांना भ
योगाची श्रेष्ठता मान्य आहे असें सिद्ध होतें. आणि ह्याच सिद्धांतांचा प्र
सूत्रांत श्रीमन्नारदांनीं त्रिवार उच्चार करून तदीतर मतांचें गौणत्व सूचित
आहे. स्वतःची प्रतिज्ञा भंग करूनही ईश्वर भक्तप्रतिज्ञा सिद्धिस नेतो,
"**रथांगपाणि**" ह्या नामवाचनावरून सिद्ध होतें. ह्यापेक्षां भक्तीचा
अधिक कसा करावा? शाहत्तराव्या सूत्रांत सुरु केलेला उपसंहार येथें सं

**सूत्र ८२ ॥ गुणमहात्म्यासक्ति, पूजासक्ति, स्मरणासक्ति दास्यासक्ति, सख्यासक्ति, कांतासक्ति, वात्सल्यासक्ति, आत्मनिवेदनासक्ति, तन्मयतासक्ति, परमविरहासक्ति, एकधाप्येकादशधा भवति ॥**

**आर्या:**—॥ कीर्तन दर्शन पूजन, मनन तसें दास्य सख्य वा सेवा ॥
॥ वत्सल्यात्मार्पण वा, तन्मयता परमविरहता ह्यांची ॥१॥

॥ पूर्णासक्ति असणें ऐशी एकात्मिकाचि भिन्नत्वें ॥
॥ भक्ती असतें परिमल, अंत्यचि द्यावी कृपा करुनि **सांई** ॥२॥

**विवरण:**—सतराव्या सूत्रांत श्रीमद्भागवतांतील नवविधा भक्तीचें जें वर्णन केलें आहे, त्याच्यांत आणि ह्या सूत्रांतील वर्णनांत फेर आहे. गुणमहात्म्यासक्तीमध्यें भागवतोक्त श्रवणभक्ति आणि कीर्तनभक्ति ह्या दोन्ही येतात आणि त्याचप्रमाणें पूजासक्तीमध्यें अर्चनभक्ति व वंदनभक्ति ह्या दोन्ही येत असून पादसेवनभक्तीलाच ह्या सूत्रांत कांतासक्ति म्हटलें आहे. अशा प्रकारें भागवतोक्त नऊ प्रकारांचेच ह्या सूत्रांत सात प्रकार होऊन त्यांत रूपासक्ति, वात्सल्यासक्ति, तन्मयतासक्ति व परमविरहासक्ति ह्या चार प्रकारांची भर घातल्यामुळें सूत्रांतील अकरा प्रकार झाले आहेत. श्रीमहालक्ष्मीची पादसेवनभक्ति कांतासक्तिरूपानें देवी श्री-सीता, देवी रुक्मिणी, ह्यांनीं केली. रूपासक्ति म्हणजे ध्यानभक्ति ही श्रीवसिष्ठांनीं उत्तम प्रकारें केली. ध्यानस्थ झाल्यावर श्रीरामचंद्र ज्या स्थितींत असतील, त्याच स्थितींत त्यांना प्रकट होत असत. वात्सल्यासक्तीचीं श्रेष्ठ उदाहरणें महाराजा श्रीदशरथ आणि देवी कौसल्या हीं रामावतारांतील व वसुदेव-देवकी आणि नंद-यशोदा हीं कृष्णावतारांतील होत. तन्मयतासक्ति ही प्रत्येक मुमुक्षूच्या ठिकाणीं असते. आणि उत्तम प्रकारची

परमविरहासक्ति व्रजगोपिकांनींच दाखविली. हा शेवटला प्रकार सर्वश्रेष्ठ आहे, असें एकोणिसाव्या सूत्रावरून स्पष्ट होत आहे. संस्कृतभाषाज्ञान नसून फक्त श्रद्धापूर्वक केलेल्या ऐकांतिक भक्तीच्या दीर्घकाल तपाचरणानें अतींद्रियज्ञान प्राप्त झाल्याचीं उदाहरणें आहेत. आणि कल्पनातीत अतींद्रियज्ञानाच्या अलौकिक सामर्थ्याबद्दल सुदैवानें मुंबईचे सुप्रसिद्ध विद्वान शास्त्रज्ञ डॉ. विनायक नारायण ऊर्फ बाबासाहेब भाजेकर ह्यांची प्रत्यक्षानुभवानें पक्की खात्री झाली आहे, असें त्यांनीं स्वतःच एकदोनदा खुद्द आमच्यापाशी कबूल केलें आहे. अशा ज्ञानाला आणि त्याच्या प्राप्तिसाधनांना मिथ्या समजल्यानें तीं तर मिथ्या होत नाहींत.

**सूत्र ८३ ॥ इत्येवं वदन्ति जनजल्पनिर्भयाः एकमताः कुमार व्यासशुकशांडिल्य गर्ग विष्णु कौंडिन्य शेषोद्धवारुणि बलि हनुमद्विभीषणादयो भक्त्याचार्याः ॥**

**आर्या.** ॥ भक्त्याचार्यांमध्यें, श्रेष्ठ असे असति जे त्रयोदश त्यां ॥
॥ मान्य असति हीं सूत्रें, **साई**रूपें तयांसि वंदित मी ॥

**विवरणः**—भक्तियोगाच्या थोरथी गणाच्या महानुभाव महाज्ञानी महात्म्यांमध्यें देवर्षिश्रेष्ठ महाभक्त श्रीमन्नारदांनीं श्रीसनत्कुमारांना आद्यस्थान दिलें आहे. श्रीसनत्कुमारांचें ज्ञान इतकें अगाध होतें, कीं श्रीमदाद्य शंकराचार्यांनासुद्धा श्रीसनत्कुमारांचें सनत्सुजातीय श्रीमद्भगवद्गीतेइतकेंच वंदनीय वाटून त्यांनी गीताभाष्याप्रमाणें त्याच्यावर भाष्य केलें; आणि शुद्ध गुणमहात्म्यासक्तीनें त्यांनीं श्रीविष्णुसहस्रनामावरही भाष्य लिहिलें. ह्याप्रमाणें भक्तियोगाची परंपरा सर्व महात्म्यांनीं वैदिक कालापासून आजपर्यंत अव्याहत चालू ठेविली आहे, ह्याव-

रून भक्तिची सर्वश्रेष्ठता सहजच प्रस्थापित होते. आत्यंतिक परमात्मप्रेमालाच भक्ति म्हणतात, अशी द्वितीय सूत्रांत भक्तीची व्याख्या केली आहे. आणि त्याच व्याख्येवरून "**जीवो ब्रह्मैव ना परः**" ह्या सिद्धांतान्वयें सर्व जीवांच्या ठिकाणीं आत्मवत् असलेलें प्रेम म्हणजेच भक्ति होय, असा सिद्धांत प्रस्थापित होतो. अशा प्रेमाशिवाय असलेलें ज्ञान शुष्क होय, म्हणजे तत्त्वतः तें ज्ञानच नव्हे. असा विचार मनांत आणूनच ज्ञानयोगी पुरुष '**सर्वभूतेहिते रतः**' (भ. गी. १२—४) असे असतात, असें भगवंतांनीं म्हटलें आहे. अशा परोपकाररत असलेल्या समदृष्टि ज्ञानी पुरुषांकडून कोणत्या परोपकारप्राप्त कर्माचा त्याग होईल ? हें शास्त्ररहस्य न समजून अज्ञानी पंडितंमन्य ज्ञानी पुरुषांना सहजत्वें प्राप्त होत असलेल्या सर्व कर्मसंन्यासाला गौणत्व देतात. कारण ज्ञानी पुरुष कर्मद्वेषबुद्धीनें सर्व कर्मसंन्यास करून अवश्य कर्तव्य असलेल्या परोपकाररत कर्मासही मुकतात, अशी त्यांची समजूत झालेली असते. वासनाक्षय झाल्यावर कोणत्याही अप्राप्त कर्माची इच्छा होणें शक्य नाहीं. आणि अशा तऱ्हेनें पूर्ण कामनाश झाल्यावर प्रारब्ध प्राप्तकर्माचा जो त्याग करीत नाहीं (भ. गी. १४—२२) तोच खरा "**नित्यसंन्यासी**" होय. (भ. गी. ५—३), हें शास्त्ररहस्य त्यांना समजत नसतें. सच्चिदानंदमय अक्षर ( भ. गी. ८-३ ) परमात्मस्वरूप हृदयांत शुद्ध ठेवावयाची इच्छा असल्यास प्रथमतः क्षरभाव आधिभूताची ( भ. गी. ८-४ ) तेथून हकालपट्टी करून अक्षराला जागा रिकामी केली पाहिजे. म्हणजे अधिभूतरूपी द्वैतात्मक सकलकामांचा त्याग करून चित्तांत समत्वरूपी योगाला (भ. गी. २-४८,५०-६-३३ ) आश्रय दिला पाहिजे; कारण समत्व म्हणजे द्वैतभावोद्भूतभेदबुद्धिनाश, हें परमात्म्याचें स्वरूप आहे ( भ. गी. ५-१९ ). अशा प्रकारें वैराग्यपूर्वक केवळ परमात्मपर असलेल्या पुरुषा-

-सच योगयुक्त म्हणतात ( भ. गी. २-६१ ).अशा योगयुक्त पुरुषास सुखदुःख लाभालाभ, जयापजय ( भ. गी. २-३८ ), इच्छाद्वेष इत्यादि द्वंद्वमोह ( भ. गी. ७-२७ ) नसल्यामुळें तो स्वभावतःच सर्वारंभपरित्यागी ( भ. गी. १२-१६।१४-२५ ) झालेला असतो; म्हणजे तो बुद्धिपूर्वक कोणत्याहि कर्माचा अंगिकार करीत नाहीं. कारण सर्व कर्मारंभ प्रकृतीपासून म्हणजे प्रकृतीगुणांमुळें होत असून त्याचा गुणातीत आत्मस्वरूपाशीं कांहींएक संबंध नसतो ( भ. गी. ३-२७।१३-२९।१४-२३ ), अशी त्याची पक्की खात्री झालेली असते. अर्थात् "**अप्रियामाजी प्रवृत्ति होणार नाहीं ॥**" ह्या ज्ञानसागरोक्त सर्वानुभवरूप सिद्धांताप्रमाणें ज्यांचें प्रियाप्रियरूप द्वंद (भ.गी. ५-२० ) नाश पावलें असेल, त्यांच्याकडून अहंकर्तृत्व भावनामूलक कोणताही कर्मारंभ होणें जरी शक्य नसलें, तरी "**सर्वभूतहिते रतः**" (भ. गी. १२-४ ) असें असणें, हा त्याचा प्रकृतिधर्मच असल्यामुळें त्याच्याकडून प्रत्येक परोपकारक प्राप्तकर्म अवश्यत्वें होणारच (भ.गी. ३-३३)

अशा प्रकारें परमेशपर असलेल्या निवृत्तिनाथांची प्रथमतः कास धरावी लागते (भ. गी. २-४५) म्हणजे ते स्थाथिताला ज्ञानेश्वरांच्या स्वाधीन करून त्यांच्या करवीं सोपानदेवांच्या पायाशीं नेऊन बसवितात. आणि इतकें झालें म्हणजे सोपानदेवांच्या आधारानें साधकाला शेवटीं मुक्ताबाईच्या कृपेचा लाभ होतो. ह्या मुक्ताबाईकडे जाण्याच्या मार्गांतील जीं अनेक वसतिस्थानें आहेत त्या सर्वांचीं कुलूपें उघडण्याला भक्ति हीच एक किल्ली आहे, म्हणून तिला अखेरपर्यंत सारखी जपून ठेवली पाहिजे; म्हणजे मार्ग संपल्यावर ती आत्मरतिरूपानें साधकाला आपोआप माळ घालते; परंतु मध्येंच जर ती हरवली, तर पुढील वसतिस्थानें दुर्गम होऊन साधक माघारा फिरतो, आणि त्यामुळें साध्यप्राप्ति दुरावते. बाकी "**नमे भक्तःप्रणश्यति**" ( भ. गी. ९-३१ ) हा निवृत्तिनाथांचा दाखला केव्हां तरी सफळ होतोच.

**सूत्र ८४ ॥ य इदं नारदप्रोक्तं शिवानुशासनं विश्व-सिति सिद्धते स भक्तिमान् भवति सप्रेष्टं लभते इति ॥**

**आर्या** ॥ श्रद्धेनें अनुसरती, मुमुक्षुजन जे शिवानुशासन हें ॥
॥ मुक्ति तयांना लाभे, निःसंशय हें वदे स्वतः **सांई** ॥

**विवरण**—भोलानाथ दिगंबर परमात्मा शिवशंकर महादेव हे अतिशयित भक्तिप्रिय असून शीघ्र फलदायक आहेत. तसेच ते,

**"विठोनें शिरीं वाहिला देवराणा। तया मानसीं ध्यास रे त्यासि नेणा ॥**
**निवाला स्वयें तापसी चंद्रमौळी ॥ जिवा सोडवी राम हा अंतकाळीं ॥**

ह्या समर्थोक्तिप्रमाणें महान् रामभक्तही आहेत. ते भक्तियोगमार्गाचे आद्य प्रवर्तक असल्यामुळें नाथ-पंथांत त्यांचें आदिनाथ असें नांव आहे. ब्रह्मा, विष्णु आणि महेश ह्या अनुक्रमें रज, सत्त्व आणि तम अशा भिन्न गुणांच्या तिन्ही मूर्ति जगाची उत्पत्ति, स्थिति आणि लय करणाऱ्या आहेत. ह्या मायिक कल्पनेनें त्यांना भिन्नत्व आलेलें असून तत्त्वतः त्या ब्रह्मस्वरूपच आहेत. असा विचार केला म्हणजे नारदांची हीं भक्तिसूत्रें त्यांना श्रीशंकरापासून म्हणजे परब्रह्म स्फूर्तीनें प्राप्त झालेलीं आहेत. त्यांच्यावर पूर्णश्रद्धा ठेवून जो तदनुसार आचरण करील, तो भक्तिपूर्ण होऊन मुक्तही होईल, असा ह्या सूत्रांचा अर्थ आहे. म्हणजे श्रीनारदांचा आशीर्वाद आहे. अर्जुन हा कृष्णभक्त होता, ह्यास्तव जयद्रथवधाची त्याची प्रतिज्ञा खोटी होण्याचा प्रसंग आला, तेव्हां श्रीकृष्णानें ती निजसामर्थ्यानें खरी करून दाखविली; मग भक्तशिरोमणि श्रीनारदांचें हें आशीर्वादात्मक वचन खोटें कसें होणार ? त्यांच्या वचनावर दृढश्रद्धा ठेवून तदनुसार वागण्याचा निश्चय मात्र पाहिजे, म्हणजे "**निश्चयाचें बळ ॥ तुका म्हणे तेंचि फळ,**" असा अनुभव येऊन—

जात हमारो आत्मा । जीव हमारा नाम ॥
आलख हमारा घर है । गगन हमारा गाम ॥

असें म्हणण्याचा अधिकार प्राप्त होईल.

## इति सूत्रार्थ विवरणं समाप्तम् ॥

गुण वर्तती गुणी ते, ऐसें उमजूनिया अहंभावना
ठेवूं कर्मीं न कदा, **साईसम** सकल जीव आम्हांतें ॥ भ. गी. ३-२८ ॥

॥ सीमोल्लंघनसमयीं, एकुणपन्नास साल अठराशें ॥
॥ पुण्यदिनीं गुरुवारीं, लेखन झालें समाप्त **सांई**कृपें ॥१॥

॥ विवरण हें सूत्रांचें, सकलहि अर्पण करूनि **सांईला** ॥
॥ हा नीलकंठ नमितो, **सांईभावेंचि** सकल सद्भक्तां ॥२॥

ॐतत्सब्रह्मार्पणमस्तु ॥ शुभंभवतु ॥
**ॐशांतिः शांतिः शांतिः**

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याच्या अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमच्याकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी

वार्षिक वर्गणी टपालखर्चासह मनिऑर्डरनें आगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।=, मागील अंकास शिल्लक असल्यास ॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बाळबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाच्या दोन्हीं बाजूंस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नावाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंती अगर नापसंती कळविली जाईल. पसंती कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमच्याकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक **श्रीसाईलीला**

दक्षिणा प्राइझ कमिटीनें बक्षिस दिलेला व केसरी, चित्रमयजगत्, ज्ञानप्रकाश, विविधज्ञानविस्तार, व रत्नाकर वगैरे वृत्तपत्रें व मासिकांनीं उत्कृष्ट अभिप्राय दिलेला असा संतकवि ह. भ. प. श्री दासगणूमहाराज यांनीं नवीन रचिलेला व प्रोफेसर श्री. नी. चाफेकर. M. A., LL. B. यांनीं प्रस्तावना लिहिलेला नवीन ग्रंथ

श्री पासष्टी-भावार्थ-दीपिका

हा नरेंद्र बुक डेपो, दादर, मुंबई येथें मिळेल.

कापडी प्रत १० आणे. साधी प्रत ८ आणे.

सर्व प्रकारचे मेंदूच्यः विकारांवर जाग्रण व मानसिक श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी

नकलेबद्दल ] ब्राह्मी तेल [ सावध राहावें.

बाळबाळंतिणीकरितां औषधें

बाळंतकाढा नं. १—पहिल्या दहा दिवसांचा ०।४; बाळंतकाढा नं. २ दहा दिवसानंतर ०।४; बाळकडू:—मूल जन्मल्यापासून देण्याच योग्य ०८; कुमारीआसव लहान मुलांकरितां ०।२.

सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक

एक रतल १।१० ) द्राक्षासव ( अर्धा रतल ०।४
दीड रतल २।८ ट. ख. पं. नि.

शिवाय आमच्या कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे ५०० वर औषधें तयार आहेत. त्यांच्या माहितीचा मोठा कॅटलाग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां "रुग्ण-पत्रिका" ही सात आण्यांची तिकिटें आलीं असतां पाठवूं.

दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स. आर्यौषधी कारखाना, चेंबूर, जि. ठाणें.
टे. नं. ८७०२४ X २२२७८. दुकान दवाखाना, ठाकुरद्वार, मुंबई नं० २
पुणें:—श्री साईनाथ आणि कंपनी

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, २६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें रामचंद्र काशिनाथ तटणीस यांनीं छापून रा. आ. तर्खड यांनीं ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें येथें प्रसिद्ध केलें.